## न्यायाधीश सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी मु. अलिबाग

(पिठासीन अधिकारी श्रीमती. एस. एस. पोरे)

किरकोळ अर्ज क. आर.टी.एन ०१/१८

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकार बॅक.मर्या, अर्जदार.
तर्फे, अधिकरी श्री. संजय बाळगोंडा पाटील

**विरूध्द**

श्री राजीव यशवंत संसारे (मयत)

तर्फे वारस व इतर

**निशाणी १ वरील आदेश**
**(दि.२७/०७/२०१८)**

१. मूळ सहकारी वाद क्र.४५/१९९२ चे कामी दि.३०/११/२०१७ रोजी झालेला वाद काढून टाकणेचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता आणि मूळ वाद पुन्हा फैलावर घेणेकरिता प्रस्तुत अर्ज दाखल करणेत आला आहे.

२. अर्जदार बॅकेचे असे कथन आहे की, दिनांक ३०/११/२०१७ रोजी बॅकेचे अधिकारी श्री. सुहास नारकर हे आजारी असल्यामुळे मूळ वादाचे कामी सरतपास आणि उलटतपासाकरिता हजर राहु शकले नव्हते, सबब बॅकेतर्फे नि.११९ कडे तहकुबीकरिता अर्ज दाखल करणेत आला होता जो न्यायालयाने रद्द केला आणि त्याच दिवशी वादही रद्द केला. बॅकेने मूळ वाद अपहार रकमेच्या व्याजासह वसुलीकरीता दाखल केला होता. वाद काढून टाकणेच्या आदेशामुळे बॅकेची वसुलीची प्रक्रिया थांबली आहे व त्यामुळे बॅकेस मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे. श्री. नारकर यांचा गैरहजर राहणेविषयी कोणताही गैरअर्थ नव्हता. ते आजारी असल्याबाबतचा वैदयकीय दाखला सोबत जोडला आहे. त्याच आशयाचा अर्ज न्यायालयात दिला असताना न्यायालयाने तो

27/7/18

रद्द केला. सबब मूळ वाद पुन्हा फैलावर घेणेकरिता प्रस्तुत अर्ज दाखल करणेत आला आहे.

३. जाब देणारांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्जास मुदतीच्या कायदयाचा बाध आहे, साक्षीदाराचा वैदयकीय दाखला दिनांक २१/११/२०१७ रोजीचा असून त्याला एक आठवडयाची विश्रांती घेण्याचा सल्ला देणेत आला होता, सबब दिनांक ३०/११/२०१७ रोजी तो न्यायालयात हजर राहु शकत होता, अशा प्रकारे वाद पुन्हा फैलावर घेणेकरिता योग्य स्पष्टीकरण देणेत आलेले नाही.

४. दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. मूळ वादातील नि.१ व त्यावरिल आदेश तसेच निशणी ११७ व निशाणी ११९ येथिल अर्ज निशाणी ३ यादीसह अ.क्र. १ ते ३ येथे दाखल करण्यात आले आहेत. ते असे स्पष्ट करतात की, १० वर्षापेक्षा जास्त जुन्या वादाचे कामी वादी सलग दोन नेमले तारखांना गैरहजर राहिलेच्या कारणास्तव दिनांक १७/११/२०१७ रोजी वादी बॅंकेचा पुरावा बंद करून मूळ वाद काढून टाकणेकरिता दिनांक. २३/११/२०१७ अशी तारीख नेमण्यात आली. दिनांक २३/११/२०१७ रोजी पुढील तारखेस साक्षीदारास हजर ठेवणेची कबुली देणा-या आणि वादीचा पुरावा बंद करणारा आदेश रद्द होणेची विनंती करणा-या वादी बॅंकेच्या नि.११७ अर्जावर न्यायालयाने असा आदेश केला की, वाद २५ वर्षे जुना असून साक्षीदार गैरहजर राहत असलेने पुढील नेमले तारखेस साक्षीदाराला हजर ठेवलेस पुरावा बंदचा आदेश रद्द ठरेल अन्यथा वाद काढून टाकला जाईल. त्या नंतर नेमलेल्या दिनांक ३०/११/२०१७ या तारखेस वादी बॅंकेने नि.११९ अर्ज देवुन साक्षीदार आजारी असल्याचे

27/7/18

कारणास्तव मुदत मागितली. सदर अर्जासोबत साक्षीदाराचा वैद्यकीय दाखला जोडणेत आला नव्हता. सबब नि.११७ वरील आदेशानुसार नि.११९ अर्ज फेटाळणेत आला आणि अंनुषंगाने वाद काढून टाकणेत आला.

६. प्रस्तुत अर्जासोबत नि.३ यादीसह अ.क्र.५ येथे बॅकेच्या सदर साक्षीदाराचा वैद्यकीय दाखला जोडणेत आला आहे. तो दिनांक २१/११/२०१७ रोजीचा आहे. साक्षीदारास एक आठवडयाची विश्रांती घेणेचा सल्ला देणेत आलेचे तो दर्शवितो. म्हणजेच दिनांक २७/११/२०१७ पर्यंत साक्षीदारास विश्रांतीचा सल्ला देणेत आला होता. वादाचे कामी नेमलेली तारीख ही त्यानंतर तीन दिवसांची म्हणजेच दिनांक ३०/११/२०१७ अशी होती. म्हणजेच सदर वैद्यकीय दाखला सदर दिवशी लागु होत नसलेचे स्पष्ट आहे. अशा प्रकारे दिनांक ३०/११/२०१७ रोजी अर्जदार गैरहजर राहण्याचे योग्य व पुरेसे कारण प्रस्तुत अर्जातुन देखील देण्यात आलेले नाही.

७. दिनांक ३०/११/२०१७ रोजी मूळ वाद काढून टाकणेत आला. म्हणजेच तो पुन्हा फैलावर घेणेकरिता करावयाचा अर्ज दिनांक ३०/१२/२०१७ रोजी अगर त्यापूर्वी दाखल करणे आवश्यक होते. प्रस्तुत अर्ज दिनांक ०२/०१/२०१८ रोजी दाखल करणेत आला आहे. म्हणजेच अर्ज दाखल करणेस २ दिवसांचा विलंब झाला आहे. मात्र अर्जदार बॅकेने सदर विलंबाबाबत कोणतेही कारण दिलेले नाही आणि सदर विलंब माफ होवुन मागितला नाही. या उलट प्रस्तुत अर्ज मुदतीमध्ये दाखल केला असलेचे कथन प्रस्तुत अर्जात करणेत आले आहे. मात्र अर्ज मुदतीत कसा आहे हे स्पष्ट करणारे कथन अर्जात करणेत आलेले नाही. जाबदेणारांनी विलंबाची बाब त्यांच्या म्हणण्यामधून निदर्शनास आणून देवुन देखील अर्जदाराने त्याबाबत युक्तीवादही केला नाही.

27/7/18

८. माझे असे मत आहे की, विलंब किती दिवसांचा आहे ही बाब महत्वाची नसुन विलंब माफ करून मागणे आणि त्यासाठी योग्य व पुरेसे कारण देणे आवश्यक असते. मात्र अर्जदाराने तसे केले नाही.

९. अशा प्रकारे दोन दिवसांच्या विलंबाने दाखल करणेत आलेल्या प्रस्तुत अर्जामध्ये विलंब माफीची विनंती करणेत आली नसलेने प्रस्तुत अर्ज फेटाळला जाणेस पात्र ठरतो.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुत अर्ज नामंजुर करणेत येत आहे.

२. या अर्जाचा खर्च पक्षकारांनी आपआपला सोसणेचा आहे.

27/7/18

(एस. एस. पोरे)
न्यायाधीश
सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी
मु. अलिबाग.

स्थळ : अलिबाग

दि. २७/०७/२०१८